MHPA220001282022

दाखल तारीख : २१/०२/२०२२

नोंदणी तारीख : २१/०२/२०२२

निकाल तारीख : २५/०६/२०२६

कालावधी : वर्ष महिने दिवस

०४ ०४ ०४

भाग 'अ'

(फौजदारी नियमावली प्रकरण ६ परिच्छेद ४४ (I))

**पालम येथील प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी यांचे न्यायालयात**

**(पिठासीन अधिकारी मनिषा म. पाटील)**

**(जाहीर दिनांक – २५/०६/२०२६)**

**संक्षिप्त फौजदारी खटला क्र. ३७/२०२२**

(गु.र.क्र. २८६/२०२१ पालम पोलीस ठाणे)

**निशाणी क्रमांक — १५ लगत**

**अभियोग पक्ष** **महाराष्ट्र सरकार तर्फे**

**पोलीस निरीक्षक,**

पालम पोलीस ठाणे, ता. पालम, जि. परभणी

**प्रतिनिधीत्व** **सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. एस. एन. डावकरे**

**आरोपी** **देवराव कोंडीबा गायकवाड**

वय — २८ वर्षे, व्यवसाय– मजुरी

रा. आईनवाडी, ता. पालम, जि. परभणी.

**प्रतिनिधीत्व** **आरोपीकरीता वकील श्री. एस. आर. रोकडे**

भाग 'ब'

(फौजदारी नियमावली प्रकरण ६ परिच्छेद ४४ (ii))

| | |
|---|---|
| गुन्ह्याची तारीख | २४/१२/२०२१ |
| गुन्हा पोलीस ठाण्यात नोंद झाल्याची तारीख | २४/१२/२०२१ |
| दोषारोपपत्र न्यायालयात दाखल केल्याची तारीख | २१/०२/२०२२ |

| | |
|---|---|
| आरोपीचा अपराधाचा तपशील नोंदवल्याची तारीख | १८/०८/२०२५ |
| पुरावा नोंदविण्यास प्रारंभ केल्याची तारीख | १३/०२/२०२६ |
| निकालाची आरक्षीत तारीख | २५/६/२०२६ |
| निकालाची तारीख | २५/०६/२०२६ |
| जर शिक्षा दिली तर त्या आदेशाची तारीख | लागू नाही. |

## आरोपीचा तपशिल

| आरोपी क्रमांक | आरोपीचे नाव | अटकेची तारीख | जामीनावर सोडल्याची तारीख | दोषारोप ठेवलेले गुन्हे | निर्दोष मुक्त केले की शिक्षा केली | दिलेली शिक्षा | फौप्रसं कलम ४२८ करिता संपरीक्षे दरम्यान निरुध्द केलेला कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | **देवराव कोंडीबा गायकवाड** | २४.१२.२०२१ | २५.१२.२०२१ | महाराष्ट्र दारूबंदी कायदा कलम ६५–ई अन्वये | निर्दोष मुक्त केले. | -- | निर्दोष मुक्त केल्यामुळे लागू होत नाही. |

**भाग 'क'**

**(फौजदारी नियमावली प्रकरण ६ परिच्छेद ४४ (iii))**

## सरकारी/बचाव/न्यायालयीन साक्षीदारांची यादी

## अ. सरकारी

| क्रमांक | नाव | **पुराव्याचे स्वरुप** (प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, पोलीस साक्षीदार, तज्ज्ञ साक्षीदार, वैद्यकीय साक्षीदार, पंच साक्षीदार, इतर साक्षीदार) |
|---|---|---|
| अ.सा.१ | गंगाधर देवराव शिंदे | जप्ती पंच साक्षीदार |

## ब. बचावाचे साक्षीदार

| क्रमांक | नाव | **पुराव्याचे स्वरुप** (प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, पोलीस साक्षीदार, तज्ज्ञ साक्षीदार, वैद्यकीय साक्षीदार, पंच साक्षीदार, इतर साक्षीदार) | निशाणी क्रमांक |
|---|---|---|---|
| **नाही.** | | | |

## क. न्यायालयीन साक्षीदार

| क्रमांक | नाव | **पुराव्याचे स्वरुप** (प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, पोलीस साक्षीदार, तज्ज्ञ साक्षीदार, वैद्यकीय साक्षीदार, पंच साक्षीदार, इतर साक्षीदार) | निशाणी क्रमांक |
|---|---|---|---|
| **नाही.** | | | |

## सरकारी/बचाव/न्यायालयीन कागदोपत्री निशाणांची यादी

## अ. सरकारी

| क्रमांक | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १ | २४/अ.सा.क्र.१ | अ.सा.क्र.१ यांची पंचनाम्यावरील सही |
| २ | २९ | रासायनिक पृथ्थकरणाचा अहवाल |

## ब. बचाव

| क्रमांक | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| नाही. | | |

## क. न्यायालयीन निशाण्या

| क्रमांक | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| नाही. | | |

## मुद्देमाल

| अ.क्र. | मुद्देमाल वस्तु क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १ | -- | १८० मि. ली. मापाच्या देशी दारू भिंगरी संत्राच्या ९६ बाटल्या |
| २ | -- | एक होंडा कंपनीची पासींग नसलेली सी.डी. डिल्कस मोटार सायकल. |

## न्यायनिर्णय
## (जाहीर दिनांक २५/०६/२०२६)

प्रस्तुतचा खटला हा आरोपीविरुध्द महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम, १९४९ चे कलम ६५(ई) प्रमाणे शिक्षापात्र असलेल्या गुन्ह्यासाठी चालविण्यात आला.

०२. **अभियोग पक्षाची थोडक्यात हकीकत पुढीलप्रमाणे–**

दिनांक २४/१२/२०२१ रोजी यातील फिर्यादी नागनाथ नाथराव मुंढे यांना मिळालेल्या बातमीनुसार ते व इतर पोलीस कर्मचारी हे भोगाव कमानीजवळ, ता. पालम, जि.परभणी येथे सकाळी ११.२० वाजता गेले असता तेथे त्यांना आरोपी हा सी. डी. डिलक्स मोटार सायकलवरून येत असताना दिसला. त्यांनी त्याला हात दाखवुन थांबवले व त्याच्या मोटार सायकलवर असलेल्या चादरची पाहणी केली असता त्यांना त्यामध्ये देशी दारू भिंगरी संत्राच्या ९६ सिलबंद बाटल्या मिळुन आल्या. आरोपी हा विनापरवाना अवैधरित्या देशी दारू स्वतःच्या ताब्यात बाळगुन असताना मिळून आला असल्याने त्याच्याविरुध्द फिर्याद दाखल करण्यात आली.

०३. सदर फिर्यादीवरून आरोपीविरुध्द गु.र.नं. २८६/२०२१ नोंदविण्यात आला. त्यानंतर तपासी अधिकारी एस. एम. देशमाने, पोलीस हवालदार, पालम पोलीस ठाणे यांनी सदर गुन्ह्याचे तपासकाम केले. त्यांनी तपासकामी साक्षीदारांचे जाब–जबाब नोंदविले. जप्ती पंचनामा केला व तपासाअंती आरोपीविरुध्द पुरावा मिळून आल्याने महाराष्ट्र दारुबंदी

अधिनियम १९४९ चे कलम ६५(ई) प्रमाणे दोषारोपपत्र दाखल केले.

**०४.** मी आरोपीवर महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम १९४९ चे कलम ६५(ई) या अन्वये गुन्ह्याचा तपशील (नि.१५) नोंदवला. आरोपीने गुन्हा नाकबुल करून संपरिक्षेची मागणी केली. आरोपीविरुध्द गुन्हा सिध्द करण्यासाठी अभियोग पक्षाने या न्यायानिर्णयाच्या 'भाग क' मधील नमुद साक्षी पुराव्यांचा आधार घेतला आहे. यापलीकडे अभियोग पक्षास पुरेशी संधी देवूनही त्यांना उर्वरीत साक्षीदारांना न्यायालयात उपस्थित ठेवण्यात यश न आल्याने त्यांचा पुरावा बंद करण्यात आला. अभिलेखावर आरोपीविरुध्द गुन्हादर्शक पुरावा आढळून आला नसल्यामुळे आरोपीचे निवेदन वगळण्यात आले.

**०५.** अभियोग पक्षातर्फे विधीज्ञ श्री. एस. एन. डावकरे व आरोपीतर्फे विधीज्ञ श्री.एस. आर. रोकडे यांचा युक्तीवाद ऐकला. सदर प्रकरणाच्या अंतिम न्यायनिर्णयासाठी खालील मुद्दे प्रस्थापित केले आहेत. सदरचे मुद्दे व त्याचे निष्कर्ष कारणमिमांसेसह खालीलप्रमाणे आहेत.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | दि. २४/१२/२०२१ रोजी ११.२० वाजण्याच्या सुमारास मौजे आईनवाडी, ता. पालम, जि. परभणी येथे आरोपी हा देशी दारू भिंगरी संत्राच्या १८० मि. ली. मापाच्या एकुण ९६ सिलंबद बाटल्या बेकायदेशीररित्या विक्री करण्याच्या उद्देशाने बाळगुन असताना मिळून आला, म्हणून त्याने महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम १९४९ चे कलम ६५(ई) प्रमाणे गुन्हा केला असल्याचे अभियोग पक्षाने सिध्द केले आहे काय ? | **नाही.** |
| २. | अंतिम आदेश ? | **आरोपीची निर्दोष मुक्तता करण्यात येते.** |

## <u>का र ण मि मां सा</u>

**<u>मुद्दा क्र. १ बाबत</u> –**

०६. महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम, १९४९ चे कलम ६५(ई) प्रमाणे गुन्हा शाबित करण्यासाठी अभियोग पक्षाने आरोपीने महाराष्ट्र दारुबंदी अधिनियमातील नियमांचे उल्लंघन करून मादक द्रव्य (अफु किंवा भांग व्यतिरीक्त) विक्री केले आहे किंवा विकत घेतले आहे किंवा ताब्यात बाळगलेले आहे हे शाबीत करणे आवश्यक आहे. महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम, १९४९ चे कलम ६५(ई) अन्वये आरोपीने गुन्हा केला आहे हे अभियोग पक्षाने शाबीत केले किंवा कसे हे तपासण्यासाठी अभियोग पक्षाने याकामी सादर केलेल्या पुराव्याचे अवलोकन होणे आवश्यक आहे.

०७. आरोपीविरूध्दचा गुन्हा सिध्द करणेकरिता अभियोग पक्षाने सा.क्र. १ गंगाधर शिंदे यांना तपासले आहे. त्यांनी त्यांच्या सरतपासामध्ये दि. २४/१२/२०२१ रोजी पोलीसांनी त्यांना जप्ती पंचनाम्याकरीता कुठेही बोलावले नसल्याचे व आरोपीकडुन त्यांच्यासमक्ष काहीही जप्त केले नसल्याचे कथन केले आहे. त्यांनी फक्त पंचनाम्यावरील सही (नि.२४) त्यांची असल्याची मान्य केले परंतु पंचनाम्यामधील मजकुर नाकारला आहे. उपरोक्त साक्षीदाराने अभियोग पक्षास अनुसरून साक्ष दिलेली नसल्यामुळे सरकारी वकील यांनी त्यांना सुचक प्रश्न विचारले. परंतु, त्यामधुन जप्तीपंचनामा सिध्द होईल असे कुठलेही तथ्य अभिलेखावर आलेले नाही.

०८. अभियोग पक्षातर्फे तपासलेले साक्षीदार हे अभियोग पक्षाच्या कथनाप्रमाणे घटनेचे प्रत्यक्षदर्शी साक्षीदार असुन जप्तीपंच आहेत. परंतु, त्यांनी अभियोग पक्षास कोणतेही सहकार्य केलेले नाही. त्यामुळे जप्ती पंचनामा सिध्द झालेला नाही.

०९. आरोपीविरुध्द गुन्हा सिध्द करण्याकरीता अभियोग पक्षाने आरोपीच्या ताब्यात मादक द्रव्य म्हणजेच दारु मिळून आली हे निसंशयरित्या शाबीत करणे आवश्यक आहे. जर त्याच्या ताब्यातून दारु मिळून आली हे सिध्द झाले तरच त्याच्याविरुध्दचा गुन्हा सिध्द होतो. परंतु, अभियोग पक्षाने जप्ती पंच सा.क्र.१ गंगाधर शिंदे यांची साक्ष वगळता इतर कोणत्याही साक्षीदाराची साक्ष अभिलेखावर नोंदवलेली नाही.

१०. अभियोग पक्षाने याकामी रासायनिक पृथःकरणाचा अहवाल दाखल केला आहे व गुन्हा सिध्दतेकरीता त्या अहवालावर भिस्त ठेवली आहे. सदर अहवालाचे अवलोकन करता त्यामध्ये सदरचा नमुना हा तपासणीकरीता पालम येथून नांदेड येथे कोणत्या रितीने पाठविला,

तसेच तो पाठविताना कोणत्या स्थितीत होता, तसेच दरम्यानच्या काळात कोणतीही छेडछाड झाली नाही याबाबतचा कोणताही पुरावा अभिलेखावर अभियोग पक्षाने आणलेला नाही. त्यामुळे जप्त नमुना आहे त्याच स्थितीत प्रयोगशाळेत पाठवला असल्याबाबत शंका निर्माण होते. यास्तव जरी रासायनिक पृथःकरणाचा अहवाल याकामी दाखल असला तरी सदरचा अहवालावरून आरोपीच्या ताब्यातून जप्त केलेल्या मुद्देमालातून नमुना काढला व तोच नमुना जप्त केला तसाच तपासणीकरीता पाठविला असल्याचे शाबित होत नाही.

**११.** अभियोग पक्षाने घटनास्थळी छापा टाकला व छाप्यादरम्यान आरोपी हा दारुची विक्री करण्याकरिता अवैधरित्या दारू बाळगलेला मिळून आला असे कथन केले आहे परंतु याकामी छाप्यामध्ये सहभागी असलेले फिर्यादी, साक्षीदार, तसेच घटनास्थळावरील इतर साक्षीदार यांना याकामी अभियोग पक्षाने तपासणे आवश्यक होते तरच छापा टाकला हे सिध्द झाले असते परंतु अभियोग पक्षास वेळोवेळी व पुरेशी संधी देवुनही अभियोग पक्षाने याकामी इतर प्रत्यक्षदर्शी साक्षीदार तपासलेले नाहीत. तपासलेल्या साक्षीदाराच्या साक्षीवरून आरोपीने गुन्हा केल्याचे निसंशयरित्या शाबीत होत नाही.

**१२.** आरोपीकडे दारु बाळगणे व ती विक्री करण्याबाबत परवाना, पास, प्राधिकारपत्र आहे किंवा कसे याबाबतचा कोणताही कागदोपत्री पुरावा अभियोग पक्षाने दाखल केलेला नाही त्यामुळे अभियोग पक्षाच्या कथनावर संशय बळावतो.

**१३.** एकंदरीत, वर नमुद विवेचनाअंती आरोपीविरुध्द गुन्हा शाबीत होण्याकरीता सबळ पुरावा अभियोग पक्षातर्फे पटलावर आणणे गरजेचे होते परंतु अभियोग पक्षास त्यामध्ये अपयश आलेले आहे. आरोपीने गुन्हा केला असल्याचे शाबित झाले असे म्हणता येणार नाही. यास्तव मुद्दा क्र.१ बाबत माझे निष्कर्ष नकारार्थी नोंदवित आहे.

**<u>मुद्दा क्र. २ बाबत</u>** –

**१४.** प्रस्तुत खटल्यामध्ये आरोपीने महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम १९४९ चे कलम ६५(ई) प्रमाणे गुन्हा केल्याचे सिध्द करण्यात अभियोग पक्ष अपयशी ठरल्यामुळे आरोपी हा निर्दोष मुक्ततेस पात्र आहे.

**१५.** या न्यायनिर्णयाच्या 'भाग क' मधील मुद्देमाल रकान्यातील जप्त मुद्देमाल हा न्यायालयासमोर तपासी अधिकारी यांनी हजर केलेला नाही. सदर जप्त मुद्देमाल तपासी

अधिकारी यांनी जप्त केल्याचे कथन अभियोग पक्षाने केले आहे. जप्त मुद्देमाल देशी दारू भिंगरी संत्राच्या एकुण ९६ बाटल्या ह्या अपिल कालावधीनंतर नाश करणेसाठी अधिक्षक, राज्य उत्पादन शुल्क, परभणी यांच्याकडे पाठविणेबाबत तपासी अधिकारी यांना आदेशीत करणे योग्य होईल. तसेच जप्त होंडा कंपनीची सी.डी. डिलक्स मोटार सायकलवर आज अखेर कोणीही ताबा अथवा हक्क सांगितलेला नाही. त्यामुळे तिची नियमाप्रमाणे विल्हेवाट लावण्याचे निर्देश तपासी अधिकारी यांना देणे न्यायोचित होईल. सबब, मी मुद्दा क्र.२ करीता खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## आदेश

१. आरोपी **देवराव कोंडीबा गायकवाड** याची महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम, १९४९ चे कलम ६५(ई) अन्वये शिक्षापात्र असलेल्या गुन्ह्यामधून भारतीय नागरीक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम २७८ (१) प्रमाणे निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे.

२. आरोपीचा वैयक्तीक जातमुचलका व जामिनदाराचे बंधपत्र रद्द करण्यात येते.

३. जप्त मुद्देमाल देशी दारू भिंगरी संत्राच्या प्रत्येकी १८० मि.ली. मापाच्या ९६ बाटल्या ह्या अपील कालावधीनंतर नाश करण्याकरीता अधिक्षक, राज्य उत्पादन शुल्क, परभणी यांच्याकडे पाठविण्यात यावी.

४. जप्त होंडा कंपनीची सी.डी. डिलक्स मोटार सायकलचे अपील कालावधीनंतर नियमाप्रमाणे विल्हेवाट लावण्यात यावी.

५. आरोपीने भारतीय नागरीक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम ४८१(१) प्रमाणे रक्कम रु.५,०००/– चा वैयक्तीक बंधपत्र द्यावे.

(येणेप्रमाणे न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहीर करण्यात येतो.)

MANISHA MAHADEO PATIL

Digitally signed by MANISHA MAHADEO PATIL
Date: 2026.06.25 17:36:12 +0530

**दिनांक– २५/०६/२०२६** **(मनिषा म. पाटील)**

**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, पालम.**